।। सहोद्योगेन श्रियः ।।

# कांचनगौरी महिला सहकारी पतपेढी मर्यादित, डोंबिवली

(रजि. नं. टीएनए / केवायएन /आरएसआर /२०६ दि.०९-०३-१९८२)

रिध्दीसिध्दी कॉम्प्लेक्स, पहिला मजला, पं. मालवीय पथ, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१

## अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**स.न.वि.वि.**

सर्व सभासदांना कळविण्यात येते की पतपेढीची सदतिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. १५ जुलै २०१८** या दिवशी ठीक **दुपारी ३.३० वाजता आदित्य मंगल कार्यालय, आगरकर रोड, डोंबिवली (पू.)** येथे बोलावण्यात आली आहे.

### ● सभेची विषय पत्रिका ●

१) दि. १४ मे २०१७ रोजी झालेल्या मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) कार्यकारी मंडळाने सादर केलेले दि. ३१ मार्च २०१८ अखेरचे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वार्षिक अहवालास मंजुरी देणे व लेखापरिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

३) संचालक मंडळाने सूचित केलेल्या नफा विभागणीस तसेच लाभांश वाटपांस मंजुरी देणे.

४) सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकापेक्षा वाढीव झालेल्या उत्पन्न-खर्चास तसेच पुढील २०१८-२०१९ सालच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

५) २०१८-२०१९ या वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे आणि त्यांचा मेहनताना ठरविणे.

६) २०१७-२०१८ च्या लेखापरिक्षण अहवालात नमूद दोषांची दुरूस्ती करून अहवाल सादर केल्याची नोंद घेणे.

७) मा. संचालक मंडळाने सुचविलेली पोटनियम दुरूस्ती स्वीकारणे.

८) ज्या सभासदांनी भाग रक्कम रू. १००/- पेक्षा कमी आहे अशा सभासदांनी माहे ऑक्टोबर २०१८ अखेर पर्यंत ज्यादा भाग खरेदी करून ती किमान रू. ५००/- करणे अथवा त्यांची असलेली भाग रक्कम वरील दिनांका पर्यंत परत घेऊन जाणे अन्यथा त्यांची भाग रक्कम राखीव निधीस वर्ग करण्यात येईल, यावर विचार करणे.

९) आजच्या सभेस सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा, संचालक मंडळाच्या आदेशावरून

**सौ. ज्योत्स्ना भावे**
व्यवस्थापिका व मुख्य कार्यकारी अधिकारी

दिनांक : २७/०६/२०१८

---

### सूचना

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी त्याच जागी अर्ध्या तासाने भरेल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहाणार नाही.

२) ज्या सभासदांना आर्थिक पत्रकांसंबंधी माहिती हवी असल्यास किंवा काही विधायक सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी दि. १० जुलै २०१८ पर्यंत मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत लेखी स्वरूपात कळवावे.

३) ज्या सभासदांनी भागपत्र नेले नाही, त्यांनी ते मुख्य कार्यालयातून घेऊन जावे.

४) सभासदांनी बदललेला पत्ता संस्थेस लेखी कळवावा.

५) सभेचे कामकाज संपल्यानंतर त्याच ठिकाणी १०वी व १२वी परीक्षेत विशेष गुण प्राप्त केलेल्या सभासदांच्या पाल्यांचा गुण गौरव करण्यात येईल.

Scanned by CamScanner